नि.दि.दा. क्र. ४५/२०२२
उत्तम वि. विलास व इतर
CNR No.MHWS080003332022

## निशाणी क्र. १९ खाली आदेश
## (पारित दिनांक ०४.०२.२०२३)

प्रतिवादी क्र. ०४ ने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द झालेला विना जवाब दावा आदेश रद्द होणेबाबत दाखल करुन घेण्यासाठी केला आहे. त्यांचे कथनानुसार, प्रस्तुत प्रकरण वादीने वाद मिळकतीची वाटणी होऊन ताबा मिळणेकरिता दावा दाखल असून दाव्यामध्ये प्रतिवादी हजर झाले. परंतु कागदपत्राअभावी मुदतीत जवाब दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे दिनांक २२.०६.२०२२ रोजी वि. न्यायालयाने प्रतिवादींविरुध्द लेखी जवाबाशिवाय प्रकरण चालविणेबाबत आदेश पारीत केला आहे. प्रतिवादी पुराव्याकामी लागणारे महत्वाचे दस्तऐवज मिळकत नसल्यामुळे लेखी जवाब दाखल करण्यास वेळोवेळो दिलेले अर्ज वि. न्यायालयाने नामंजूर केले. प्रतिवादी क्र. ०४ हा पुढील तारखेस लेखी जवाब दाखल करीत असून जवाब दाखल करण्यास परवानगी न मिळाल्यास प्रतिवादी क्र. ०४ चे न भरुन निघणारे नुकसान होईल. याउलट अर्ज मंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र. ०४ चा लेखी जवाब दाखल झाल्यास वि. न्यायालयास न्याय देणे सोयीस्कर होइूल. अशा परिस्थितीत प्रतिवादिी क्र. ०४ विरुध्द झालेला विना लेखी जवाब आदेश रद्द होऊन लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. याउलट वादीच्या वकीलांनी अर्जास दर्शवुन अर्ज २,०००/– रुपये खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

<u>०२</u> दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी ०४ हा गैरहजर असल्याने त्याच्या मुलावर दिनांक १४.०३.२०२२ रोजी, समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु प्रतिवादी क्र. ०४ हजर न झाल्याने त्याच्याविरुध्द दिनांक २२.०६.२०२२ रोजी एकतर्फा आदेश पारीत झाला. त्यानंतर उशीरा त्याचदिवशी प्रतिवादी क्र. ०४ हा नि.क्र. ०९ नुसार वकीलामार्फत हजर झाला. त्याचा नि.क्र. १२ नुसार लेखी जवाब दाखल करण्यास वेळ वाढवून मिळण्याचा अर्ज नामंजूर झाला होता. त्यानंतर आजरोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

<u>०३</u> प्रतिवादीला दिनांक ११.०३.२०२२ रोजी समन्स तामिली झालेली होती.

त्यानंतर दिनांक २२.०६.२०२२ रोजी एकतर्फा आदेश पारीत झाला होता. त्यामुळे जवाब दावा दाखल करण्याचा ९० दिवसांचा कालावधी अगोदरच निघुन गेलेला असल्यामुळे प्रतिवादी क्र. ०४ च्या वकीलांनी जवाब दावा अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे. प्रकरणाचे अवलोकन केले असता जवाब दावा दाखल करण्याचा ९० दिवसांचा कालावधी अगोदरच संपला आहे. परंतु नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रकरणाचे गुणदोषावर निराकरण होण्याकरिता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने वादीला झालेल्या त्रासाकरीता सदर अर्ज खर्चासह मंजुर होणे योग्य ठरेल म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी ०४ चा अर्ज २००/– रुपये खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादीला अर्जाचा खर्च अदा केल्यानंतर त्यांचा जवाब दावा अभिलेखावर घेण्यात येईल.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2023.02.04 17:58:28 +0530

( यो.द. कोईनकर)

दिनांकः ०४.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 04.02.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 04.02.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 04.02.2023 |